आळेफाटा पोलीस स्टेशन (पुणे ग्रामीण)
नगर—कल्याण हायवे रोड,आळेफाटा ता.जुन्नर जि.पुणे
Email ID- pialephata.pnr@mahapolice.gov.in
दुरध्वनी क्रमांक — (०२१३२) २६३०३३

आळेफाटा पोलीस स्टेशन/ **प्रेसनोट** दिनांक ०९/१०/२०२५

घरफोडी करणाऱ्या अट्टल परजिल्हयातील टोळीच्या आळेफाटा पोलीसांनी आवळया मुसक्या.

दिनांक २०/०१/२०२५ रोजी १२/३० वा. ते दि.१७/०२/२०२५ रोजी सकाळी ०९/३० वा.चे सुमारास मौजे नळावणे ता.जुन्नर जि.पुणे गावचे हद्दीत फिर्यादी नामे बबन दामोदर देशमुख हे मुंबई असताना कोणीतरी अज्ञात चोरटयांनी त्यांच्या राहत्या घराच्या दरवाजाचा कडी कोयंडा कापून घरात प्रवेश करून सुमारे ६०,०००/— रू किंमतीचे चांदीच्या वस्तु तसेच घडयाळे चोरून नेलेबाबत **आळेफाटा पोलीस स्टेशन गु.र.नं ८८/२०२५ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३३१(३)(४),३०५(१) प्रमाणे दि.१७/०२/२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.**

आळेफाटा पोलीस स्टेशन हद्दीतील वाढत्या घरफोडीच्या वाढत्या गुन्हयांचे गांभीर्य लक्षात घेवून सदर घरफोडी उघडकीस आणण्याच्या दुष्टीकोनाने तसेच मा.पोलीस अधीक्षक सो.पुणे ग्रामीण यांनी घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणण्याचे दृष्टीने सुचना केल्या होत्या. त्यानुसार आळेफाटा पोलीस स्टेशनकडील माहे फेब्रुवारी महिन्यात दाखल असलेला **गु.र.नं ८८/२०२५** सदर गुन्हयातील तपासा दरम्यान सदर गुन्हयातील आरोपींचा शोध घेत असताना, आळेफाटा पोलीस स्टेशन कडील गुन्हे शोध पथकाने घटनास्थळ परिसरातील पाहीलेले सी.सी.टी.व्ही फुटेजच्या आधारे व गोपनिय बातमीदारामार्फत माहिती मिळवली की, सदर गुन्हयातील संशयीत आरोपी विजय भगवान गोडे रा.तिरडे ता.अकोले जि.अहिल्यानगर याने केला असल्याची खात्रीशीर माहिती मिळाल्याने नमुद आरोपीस अकोले जि.अहिल्यानगर परिसरातून अत्यंत शिताफीने ताब्यात घेवून त्याच्याकडे गुन्हयाच्या अनुषंगाने अधिक तपास केला असता त्याने सदर गुन्हा हा २) गोरक्षनाथ पंढरीनाथ खोकले रा.पाचपट्टावाडी ता.अकोले जि.अहिल्यानगर, ३) बहिरू भिमा जाधव रा.कोकणवाडी ता.अकोले जि.अहिल्यानगर यांच्या मदतीने केला असल्याची कबुली दिल्याने नमुद सर्वांना ताब्यात घेवून त्यांच्याकडे गुन्हयाच्या अनुषंगाने अधिकचा तपास करता, त्यांनी सदर गुन्हयातील चोरलेला मुद्देमाल हा आरोपी नामे विजय भगवान गोडे याने त्याचे घरी लपवून ठेवल्याची कबुली दिल्याने लागलीच आळेफाटा पोलीस स्टेशनकडील गुन्हे पथक हे आरोपीसह त्याचे राहते घरी जावून आरोपी विजय गोडे याने लपवून ठेवलेला मुद्देमाल ताब्यात घेवून त्या मुद्देमालाचा पंचनामा करून गुन्हयाचे पुढील तपासकामी जप्त करण्यात आला आहे.

नमुद आरोपीकडून चांदीची भांडी,चांदीचे पायातील जोडवी, चांदीचे गणपती पेंडल, हातातील मनगटी घडयाळे असा ४४,०००/— रू किंमतीचा चांदीचा मुद्देमाल व गुन्हयात वापरलेली स्प्लेंडर प्लस मोटार सायकल असा एकुण १,१४,०००/— रू किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी हि श्री संदिप सिंह गिल्ल सो. पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण , मा. रमेश चोपडे सो. अपर पोलीस अधिक्षक पुणे विभाग, मा. धनंजय पाटील सो. उपविभागीय पोलीस अधिकारी सो. जुन्नर विभाग, श्री.अविनाश शिळीमकर सो.पोलीस निरीक्षक, स्था.गु. शा,पुणे ग्रामीण यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.विश्वास जाधव यांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे पो.हवा निलेश खैरे, विनोद गायकवाड, पकंज पारखे, अमित माळुंजे, पो.कॉ नविन अरगडे,निखील मोरमोरे,विशाल पालवे यांनी केली आहे.